# मॅनइटर्स ऑफ कुमाऊँ

**जिम कॉर्बेट**

अनुवाद

**विश्वास भावे**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Man Eaters of Kumaon : Jim Corbett
Marathi translation by Vishwas Bhave
First published in Marathi by Riya Publications in arrangement with Oxford University Press India, New Delhi, translated from the English language.
© Oxford University Press, 1993.

**मॅनइटर्स ऑफ कुमाऊँ :** जिम कॉर्बेट

अनुवाद : विश्वास भावे

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
विश्वास भावे
बी/३३, डोंबिवली नागरिक
सो. फुले रोड, डोंबिवली(प.) ४२१२०२
मो.नं. : ९८२०४२४८६७ ईमेल: vshwas.bhave@gmail.com

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २८०/-





शिकारमोहिमांचा प्रत्यक्ष अनुभव असणारे,
त्यावर भरभरून गप्पा मारणारे,
जंगलात भटकण्याची आवड असलेल्यांवरही
मनापासून प्रेम करणारे आणि
‘अरण्योत्सव’, ‘मृगयामित्र’ अशा सुंदर कलाकृतींची
निर्मिती करणारे माझे ज्येष्ठ मित्र आणि
सुप्रसिद्ध शिकारकथा लेखक
लालू दुर्वे यास...



# मनोगत

जिम कॉर्बेटनं लिहिलेलं हे पहिलं पुस्तक! आयुष्यभर फक्त निसर्ग आणि भारतातील साधी-भोळी माणसं यांच्यावर प्रेम करणाऱ्या जिम कॉर्बेटला स्वत:मधल्या लेखनशैलीची कल्पनाच नव्हती. केवळ, 'युद्धात आंधळ्या झालेल्या सैनिकांसाठी सेंट डन्सस फन्डने उघडलेल्या ट्रेनिंग स्कूलला मदत होईल म्हणून तरी लिहा.' या मित्रांच्या आग्रहासाठी त्याने लेखणी हातात घेतली आणि... त्याचं हे पुस्तक तुफान चाललं आणि गढवाल - कुमाऊँमधल्या पहाडी लोकांना दहशतीखाली ठेवणाऱ्या जवळजवळ डझनभर नरभक्षकांची शिकार करणारा जिम कॉर्बेट सर्वांना परिचित झाला. १९०७ साली चंपावतच्या वाघिणीपासून त्या भागात नरभक्षकांचं सत्र सुरू झालं. ही जनावरं अपवादात्मक असल्यामुळे त्यांच्याबद्दल आधीची काहीच माहिती नव्हती; त्यामुळे कुणाचं मार्गदर्शन मिळवण्याचा प्रश्नच नव्हता. केवळ निसर्ग आणि वन्यजीवांबद्दलच्या ज्ञानाच्या आधारावर त्याची मदत मागितली गेली.

या पुस्तकात पाच नरभक्षक वाघांच्या अतिशय थरारक अशा शिकारकथा आहेत. तोचतोचपणा येऊ नये म्हणून जिम कॉर्बेटने अधेमध्ये त्या काळातला सर्वांत मोठा वाघ बॅचलर ऑफ पोवाळगड, पिपलपानी वाघ, कित्येक शिकार मोहिमांमध्ये महत्त्वाची भूमिका निभावणारा त्याचा अतिशय लाडका कुत्रा रॉबिन, फिश ऑफ माय ड्रीम आणि शेवटी Just Tigers अशी सुंदर प्रकरणं टाकली आहेत.

मला स्वत:ला जाणवलेली आणि आवडलेली एक गोष्ट म्हणजे तो कोणत्याही जनावराबद्दल फक्त प्राणी म्हणून न लिहिता त्याला काही तरी ओळख देतो. रॉबिनने कॉर्बेटला त्याच्या लबाड डोळ्यांनी 'ती' घटना सांगायला कशी परवानगी दिली, पिपलपानी वाघाने, 'यापुढे मला माझ्या आयुष्यात तुझी लुडबुड चालणार नाही ही तंबी कशी दिली, बॅचलर ऑफ पोवाळगडला आपलं

हेड क्वार्टर्स कसं हलवायला लागलं, ठाकच्या वाघिणीने जोडीदाराच्या शोधात असलेल्या नराला कसा प्रतिसाद दिला वगैरे वगैरे...


या नरभक्षकांच्या मागावर राहताना कॉर्बेटच्या एकूण वागणुकीमुळे आणि स्वभावामुळे त्याला त्या भागात 'सफेद साधू' म्हणून ओळखलं जाऊ लागलं.

एक गोष्ट सांगणं इथे अतिशय महत्त्वाचं आहे. चंपावत वाघिणीच्या मागावर असताना तो ३२ वर्षांचा होता, पानार आणि मुक्तेश्वर नरभक्षकांच्या वेळेला ३५ वर्षांचा, त्यानंतर १९२६ साली रुद्रप्रयाग नरभक्षकाच्या वेळी ५२ चा, चौगड, तालादेस, मोहन, कांडा नरभक्षकांच्या वेळी ५५ चा, आणि... कल्पना करा, चुका आणि ठाक नरभक्षकांच्या शिकारीच्या वेळी तो ६३ ते ६५ वर्षांचा होता...

सर्वांत शेवटच्या प्रकरणातले कॉर्बेटचे फोटोग्राफी करतानाचे प्रयत्न विशेष वाचनीय आहेत आणि ही प्रकरणं वाचल्यावर आपल्याला त्याच्यातील सहृदयी माणूस कळून येतो.

या सर्व नुसत्या शिकारकथा नाहीत तर साहसकथा, जंगलकथा आहेत आणि जंगलवासियांच्या जीवनात शिरून घडवून आणलेला अविस्मरणीय असा फेरफटका आहे.

✦✦✦



# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | वाघ नरभक्षक का बनतात?................................ | ९ |
| २. | चंपावतची नरभक्षक........................................ | १६ |
| ३. | रॉबिन..................................................... | ४५ |
| ४. | चौगडचे वाघ............................................. | ५८ |
| ५. | द बॅचलर ऑफ पोवाळगड................................. | १०९ |
| ६. | मोहनचा नरभक्षक........................................... | १२४ |
| ७. | फिश ऑफ माय ड्रीम्स..................................... | १५४ |
| ८. | कांडाचा नरभक्षक वाघ .................................... | १६० |
| ९. | पिपलपानी टायगर .......................................... | १७२ |
| १०. | ठाकची नरभक्षक........................................... | १८३ |
| ११. | वाघांबद्दल बोलू काही...................................... | २३० |


✦✦✦



## *वाघ नरभक्षक का बनतात?*

या पुस्तकातल्या बऱ्याच गोष्टी नरभक्षक वाघाबद्दलच्या असल्याने इथे सर्वप्रथम हे सांगणं महत्त्वाचं आहे की ही जनावरं नरभक्षक का बनतात?

नियंत्रणाबाहेर गेलेल्या विशिष्ट परिस्थितीमुळे ज्या वाघांना नाइलाज म्हणून माणसाचं मांस खायची सवय लागते त्यांना नरभक्षक म्हणायला हरकत नाही. अशी नियंत्रणाबाहेर गेलेली परिस्थिती म्हणजे दहापैकी नऊ वेळा कोणत्यातरी कारणामुळे वाघ जायबंदी होणे आणि क्वचित म्हातारपणामुळे हतबल होणे. या जखमा एक तर निष्काळजीपणे मारलेल्या बंदुकीच्या गोळीमुळे झालेल्या असतात आणि त्यानंतर त्या वाघाला वेदनामुक्त करण्यासाठी पाठपुरावा होत नाही त्यामुळे किंवा साळिंदराची शिकार करताना वाघाचा संयम सुटल्यामुळे होतात. मनुष्य हे काही वाघाचं नैसर्गिक भक्ष्य नाही आणि म्हणूनच असल्या जखमांमुळे किंवा म्हातारपणामुळे वाघ फारच हतबल झाला तरच त्याच्यावर ही सवय लादली जाते.

शिकार करताना वाघ त्याच्या, वेगावर दात आणि नखांच्या स्थितीवर अवलंबून असतो. त्यामुळेच जर वाघ जखमी झाला असेल किंवा त्याचा एखादा दात तुटला असेल, नखं झिजली असतील आणि त्यामुळे त्याच्या नेहमीच्या नैसर्गिक भक्ष्य असलेल्या जनावरांची शिकार करू शकत नसेल तर तो नरमांसभक्षणाकडे वळतो.

जंगली प्राण्यांच्या शिकारीकडून नरमांसभक्षणाकडे वळणे, हे मला वाटतं बऱ्याच वेळा अपघातानेच होतं. 'अपघाता'ने म्हणजे मला काय म्हणायचंय हे कळावं यासाठी मी तुम्हाला मुक्तेश्वर या नरभक्षक वाघिणीचं उदाहरण देतो.

ही वाघीण तशी तरुण होती. एका साळिंदराची शिकार करताना तिने एक डोळा गमावला आणि पन्नास पंचावन्न काटे तिच्या शरिरात घुसले. हे काटे एक

इंच ते नऊ इंच लांबीचे होते आणि ते तिच्या पुढच्या उजव्या पायात घुसले होते. हाडाला लागल्यानंतर त्यातले बरेच काटे इंग्रजीतल्या 'यू' आकारासारखे वाकडे झाले आणि त्याचं टोक व तुटलेला भाग जवळ जवळ आला होता. हे काटे दातांनी उचकटून काढण्याच्या प्रयत्नात तिला बऱ्याच जखमा झाल्या आणि दाट गवताच्या एका तुकड्यामध्ये बसून जखमा चाटत असताना एक बाई बरोबर याच ठिकाणी गुरांसाठी गवत कापायला आली. पहिल्याप्रथम वाघिणीने तिच्याकडे दुर्लक्ष केलं, पण ती बाई जशी जशी गवत कापत अगदी तिच्यापासून फूटभर अंतरावर आली, तसा वाघिणीने बाईच्या डोक्यावर पंजाचा एक तडाखा दिला. त्या बाईची कवटी फुटल्यामुळे तिचा तात्काळ मृत्यू झाला, इतका तडकाफडकी, की जेव्हा ती दुसऱ्या दिवशी तिथे सापडली तेव्हा तिच्या एका हातात कोयता तर दुसऱ्या हातात गवताची जुडी मिळाली. त्या बाईकडे लक्षही न देता ती वाघीण तिथून लंगडत लंगडत मैलभर अंतर चालत गेली आणि तिने एका पडलेल्या झाडाच्या मागे, खड्ड्यात आश्रय घेतला. दोन दिवसांनी तिथे एक माणूस त्या पडलेल्या झाडाकडे सरपणासाठी वाळलेल्या फांद्या तोडायला आला, त्यावेळी झाडामागे बसलेल्या वाघिणीने त्याला ठार केलं. तो माणूस झाडावरच पडला. त्याने काम करताना अंगावरचे कपडे काढले होते आणि त्याला मारताना वाघिणीने त्याच्या पाठीवर नखं मारली होती, त्यामुळे असा अंदाज करायला हरकत नाही की त्याच्या पाठीतून गळणाऱ्या रक्ताच्या वासामुळे प्रथमच तिला कल्पना आली असणार की, यामुळे आपली भूक भागू शकते. जे असेल ते असो... तिथून जाताना वाघिणीने त्याच्या पाठीकडचा थोडासा भाग खाल्ला! दुसऱ्या दिवशी मात्र या वाघिणीने कोणी उद्युक्तही न करता, स्वत:हून तिसरा बळी घेतला. त्यानंतर ती नरभक्षक म्हणून स्थिरावली आणि तिने एकूण २४ माणसं मारली.

भक्ष्य खात असलेला वाघ, जखमी वाघ किंवा बच्चेवाली वाघीण क्वचित प्रसंगी अचानक बिचकावलं तर माणसांना मारतात, पण अशा वाघांना कोणत्याही परिस्थितीत नरभक्षक म्हणता येणार नाही आणि हीच चूक बऱ्याच वेळा केली जाते. मी स्वत: अशा वेळेला एकदा नव्हे तर दोनदा अशा वाघांना 'संशयाचा फायदा' द्यायला तयार आहे आणि असे मृतदेह, त्यांची नोंद 'नरभक्षक वाघाचे किंवा बिबळ्याचे बळी' अशी करण्याअगोदर पोस्टमार्टेमसाठी दिले जावेत असं